# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

### विद्यार्थिनी कल्याण मंडळ कार्यक्रम

लोकमत पुणे, बुधवार, दि. १६ जानेवारी २०१९

# दागिने बसविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन

## रोजगाराच्या नवीन संधी : स्वबळावर उभे राहण्यासाठी मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात विद्यार्थिनी कल्याण मंडळ अंतर्गत नुकतेच एकदिवसीय दागिने बसविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य. डॉ. एस. बी. पाटील तसेच या कार्यशाळेच्या मार्गदर्शिका सुनीता शिंदेकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विद्यार्थिनी कल्याण मंडळ प्रमुख प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. स्मिता कोलेकर, प्रा. रूपाली वायाळ, प्रा. कीर्ती नितनवरे, प्रा. नीता डोंगरे, प्रा. अपर्णा कुलकर्णी, प्रा. पायल ओसवाल, प्रा. प्रतीक्षा तनपुरे आदी उपस्थित होत्या. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी बोलताना विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभ्यासक्रमाबरोबर कौशल्याभिमुख कोर्सेस करण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यासाठी भारतात मोठ्या प्रमाणात दागिन्यांची बाजारपेठ असून दागिने बनवणे आणि विकणे यातदेखील रोजगाराच्या अनेक संधी निर्माण झाल्या असून विद्यार्थ्यांनी करिअरसाठी आवडीच्या प्राधान्यक्रमानुसार या क्षेत्राचा विचार करावा, असे सांगितले. सुनीता शिंदेकर म्हणाल्या की, आजच्या काळात स्वतःची ओळख निर्माण करायची असेल तर स्वतःच्या पायावर उभे असणे आवश्यक आहे. सूत्रसंचालन कोमल गायकवाड हिने तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी मानले.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात दागिने बसविण्याच्या कार्यशाळेत सहभागी विद्यार्थिनी.

सकाळ

गुरुवार,
१७ जानेवारी २०१९

# राजगुरू महाविद्यालयामध्ये दागिन्यांबाबत कार्यशाळा

**राजगुरुनगर, ता. १६ :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थिनी कल्याण मंडळाच्या वतीने नुकतेच एकदिवसीय दागिने बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेकरिता १०० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्राचार्य. डॉ. एस. बी. पाटील तसेच या कार्यशाळेच्या मार्गदर्शिका सुनीता शिंदिकर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी विद्यार्थिनी कल्याण मंडळ प्रमुख प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. स्मिता कोलेकर, प्रा. रूपाली वायाळ, प्रा. कीर्ती नितनवरे, प्रा. निता डोंगरे, प्रा. अपर्णा कुलकर्णी, प्रा. पायल ओसवाल, प्रा. प्रतीक्षा तनपुरे उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभ्यासक्रमाबरोबर कौशल्याभिमुख कोर्सेस करण्याची आवश्यकता प्राचार्य पाटील यांनी या वेळी व्यक्त केली. भारतात मोठ्या प्रमाणात दागिन्यांची बाजारपेठ असून, दागिने बनवणे आणि विकणे यातदेखील रोजगाराच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. विद्यार्थ्यांनी करियरसाठी या क्षेत्राचा विचार करावा, असे त्यांनी सांगितले. कार्यशाळेत चिंचपेटी, महाराणी हार, मोत्याची माळ, ठुशी, बांगडी, अंगठी यांसारखे दागिने कसे बनवायचे याचे मार्गदर्शन सुनीता शिंदिकर यांनी केले.

जनप्रवास
शनिवार, दि. १९ जानेवारी २०१९

# राजगुरू महाविद्यालयामध्ये दागिने बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन

**राजगुरूनगर । वार्ताहर**

राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थिनी कल्याण मंडळांतर्गत एकदिवसीय दागिने बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील तसेच या कार्यशाळेच्या मार्गदर्शिका सुनिता शिंदेकर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी विद्यार्थिनी कल्याण मंडळ प्रमुख प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. स्मिता कोळेकर, प्रा. रुपाली वायाळ, प्रा. किर्ती नितनवरे, प्रा. निता डोंगरे, प्रा. अपर्णा कुलकर्णी, प्रा. पायल ओसवाल, प्रा. प्रतिक्षा तनपुरे उपस्थित होत्या.

यावेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी बोलताना विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभ्यासक्रमाबरोबर कौशल्याभिमुख कोर्सेस करण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यासाठी भारतात मोठ्या प्रमाणात दागिण्यांची बाजारपेठ असून दागिने बनवणे आणि विकणे यातदेखील रोजगाराच्या अनेक संधी निर्माण झाल्या असून विद्यार्थ्यांनी करीयरसाठी आवडीच्या प्राधान्यक्रमानुसार या क्षेत्राचा विचार करावा असे त्यांनी सांगितले.

सुनिता शिंदेकर म्हणाल्या की, आजच्या काळात स्वतःची ओळख निर्माण करायची असेल तर स्वतःच्या पायावर उभे असणे आवश्यक आहे. त्यासाठी नोकरी हाच एकमेव पर्याय नसून अनेकानेक व्यावसायिक संधी उपलब्ध होत आहेत. दागिने बनविण्याच्या व्यवसायाकडेही संधी म्हणून पाहणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थी हे कौशल्य घरच्या घरी आत्मसात करू शकतात, असेही त्या म्हणाल्या.

या कार्यशाळेकरिता सुमारे शंभरपेक्षा अधिक विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. यात चिंचपेटी, महाराणी हार, मोत्याची माळ, ठुशी, बांगडी, अंगठी, कानातले यांसारखे दागिने कसे बनवायचे याचे मार्गदर्शन सुनिता शिंदेकर यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कोमल गायकवाड हिने तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी मानले.



राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थिनी कल्याण मंडळांतर्गत दागिने बनविण्याच्या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना सुनिता शिंदेकर.

केसरी
पुणे, १९ जानेवारी २०१९

# राजगुरू महाविद्यालयामध्ये दागिने बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थिनी कल्याण मंडळांतर्गत एकदिवसीय दागिने बसविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य. डॉ. एस. बी. पाटील तसेच या कार्यशाळेच्या मार्गदर्शिका सुनिता शिंदेकर याच्या हस्ते झाले. या प्रसंगी विद्यार्थिनी कल्याण मंडळ प्रमुख प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. स्मिता कोळेकर, प्रा. रुपाली वायाळ, प्रा. किर्ती नितनवरे, प्रा. निता डोंगरे, प्रा. अपर्णा कुलकर्णी, प्रा. पायल ओसवाल, प्रा. प्रतिक्षा तनपुरे उपस्थित होत्या.

यावेळी प्राचार्य. डॉ. एस. बी. पाटील यांनी बोलताना विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभ्यासक्रमाबरोबर कौशल्याभिमुख कोर्सेस करण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यासाठी भारतात मोठ्या प्रमाणात दागिण्यांची बाजारपेठ असून दागिने बनवणे आणि विकणे यातदेखील रोजगाराच्या अनेक संधी निर्माण झाल्या असून विद्यार्थ्यांनी करीयरसाठी आवडीच्या प्राधान्यक्रमानुसार या क्षेत्राचा विचार करावा असे त्यांनी सांगितले.

या कार्यशाळेकरिता सुमारे शंभरपेक्षा अधिक विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. यात चिंचपेटी, महाराणी हार, मोत्याची माळ, ठुशी, बांगडी, अंगठी, कानातले यांसारखे दागिने कसे बनवायचे याचे मार्गदर्शन सुनिता शिंदेकर यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल गायकवाड हिने तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी मानले.

प्रभात पुणे, बुधवार, दि. १६ जानेवारी २०१९



राजगुरूनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील कार्यशाळेत बनविलेले दागिने दाखविताना विद्यार्थिनी.

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात कार्यशाळा उत्साहात

राजगुरुनगर, दि. १५ (प्रतिनिधी) – हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थिनी कल्याण मंडळ अंतर्गत नुकतेच एकदिवसीय दागिने बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील तसेच या कार्यशाळेच्या मार्गदर्शिका सुनिता शिंदेकर याच्या हस्ते झाले. या प्रसंगी विद्यार्थिनी कल्याण मंडळ प्रमुख प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. स्मिता कोलेकर, प्रा. रुपाली वायाळ, प्रा. किर्ती नितनवरे, प्रा. निता डोंगरे, प्रा. अपर्णा कुलकर्णी, प्रा. पायल ओसवाल, प्रा. प्रतिक्षा तनपुरे उपस्थित होत्या. या कार्यशाळेकरिता १०० पेक्षा अधिक विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. यात चिंचपेटी, महाराणी हार, मोत्याची माळ, ठुशी, बांगडी, अंगठी, कानातले यांसारखे दागिने कसे बनवायचे याचे मार्गदर्शन सुनिता शिंदेकर यांनी केले. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभ्यासक्रमाबरोबर कौशल्याभिमुख कोर्सेस करण्याची आवश्यकता आहे. भारतात मोठ्या प्रमाणात दागिण्यांची बाजारपेठ असून दागिने बनवणे आणि विकणे यातदेखील रोजगाराच्या अनेक संधी निर्माण झाल्या असून विद्यार्थ्यांनी करीयरसाठी आवडीच्या प्राधान्यक्रमानुसार या क्षेत्राचा विचार करावा असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल गायकवाड तर प्रा.प्रतिमा लोणारी यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख